# परिपत्रक

क्र. डीएनएस ११२००१/५७६८८/अकरा                    मुंबई, १ ऑगस्ट २००१

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले की, राज्यातील काही जिल्ह्यातून वि.वि.मद्यार्कांची निर्यात करताना डिनेचरंट चे योग्य सुत्र वापरले जात नाही. म्हणून काही जिल्ह्यातून अशा मद्यार्कांच्या निर्यातीस परवानगी देण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्यात यावी अशा स्वरूपाच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापी सर्व जिल्ह्यातील कामकाजात एकसूत्रता रहावी म्हणून या संदर्भात सर्व परिस्थितीचा विचार करुन परराज्यात करावयाच्या मद्यार्कांच्या निर्याती संदर्भात खालील प्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. या कार्यालयाच्या उपरोक्त परिपत्रका /पृष्ठांकना नुसार कडू पदार्थाचा वापर करावयाचा असल्यास त्या सूत्राप्रमाणे अधीक्षक / जिल्हाधिकारी यांनी या कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता निर्यातीस परवानगी द्यावी. मात्र त्या आधी जेवढे मद्यार्कांचे परिमाण निर्यात करावयाचे आहे तेवढया परिमाणाचे आयात परवाने ( ना हरकत प्रमाणपत्र नव्हे ) प्राप्त झाले आहेत याची खात्री करुन घ्यावी. परराज्यात निर्यात करताना पुढे नमुद केलेल्या डिनेचरंटच्या सुत्रापैकी कोणतेही एक सुत्र निर्यात करावयाच्या विप्रकृत मद्यार्कांमध्ये वापरले जावे. या सूत्रापैकी एकही सूत्र मान्य नसेल तर आसवनीने या कार्यालयास अर्ज करावा.

(अ) शंभर (१०० ) लिटर्स साधारण विप्रकृत मद्यार्काबाबतचे डिनेचरंटचे सूत्र पुढील प्रमाणे राहील :-

९९.७५ लिटर्स शुध्द मद्यार्क + १/४ लिटर ( २५० मि.ली.) पिरीडीन बेसेस + १/२ ग्रॅम रंग क्रिस्टल व्हायोलेट + ५ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराईड किंवा बेन्झोएट

(ब) शंभर (१००) लिटर्स विशेष विप्रकृत मद्यार्काबाबतची डिनेचरंटची सूत्रे:-

denatonium Benzoate

सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

acetaldehyde

(४) ९९.५ लिटर्स शुध्द मद्यार्क + १/२ लिटर ॲसिटॅल्डी हाइड + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

toulens

(५) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर बेन्झीन किंवा टोल्वीन + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

diethyl ether

(६) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर डायइथाईल इथर + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

(७) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर डायइथाईल अमाइन + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

(८) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर ऑर्थोक्लोरो बेन्झीन + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

(९) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर इथाईल ॲसिटेट + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

(१०) ९९ लिटर्स शुध्द मद्यार्क + १ लिटर पेट्रोलियम इथर + ४ ग्रॅम डिनॅटोनियम सॅकॅराइड किंवा बेन्झोएट

२. कडु पदार्थाचा वापर विप्रकृत मद्यार्कात करावयाचा नसल्यास परराज्यातील निर्यातीसाठी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. शुध्द मद्यार्काची निर्यात परराज्यात औद्योगिक कारणासाठी करावयाची असल्यास अशा निर्यातीसाठी या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४. त्याचप्रमाणे मद्यार्काची पेय मद्य निर्मितीसाठी परराज्यात निर्यात करावयाची असल्यास अशा निर्यातीसाठी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.परराज्यात मद्यार्क निर्यात ज्या

घटकास करावयाची आहे त्या घटकांची विश्वासार्हता पाहून निर्यातीस परवानगी देणे अगर नाकारणे या बाबतचा निर्णय हे कार्यालय घेईल.

५. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे जरुरी असल्यास आयात परवान्यांच्या छायांकित प्रतीसह आसवनींनी या कार्यालयास या पुढे अर्ज करावेत. या कार्यालयातील कार्यासन क्रमांक ४ पेय मद्य निर्मिती साठी निर्यातीची प्रकरणे हाताळेल व कार्यासन क्रमांक ११ औद्योगिक कारणासाठी विप्रकृत / शुध्द मद्यार्क निर्यातीची प्रकरणे हाताळेल. कार्यासन क्रमांक ४ व ११ कडून परिपूर्ण प्रकरणी एक आठवडयात कार्यवाही पूर्ण करणे बंधनकारक राहिल.

परिपत्रकाची पोहोच अधीक्षकांनी उलटटपाली द्यावी.

(ए. रामकृष्णन)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
२. सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
३. सर्वअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
४. राज्यातील सर्व आसवनीवरील व अतिशुध्द मद्यार्क निर्मिती करणाऱ्या घटकाकडील प्रभारी अधिकारी ( मार्फत : अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क )
५. राज्यातील सर्व आसवनी व अतिशुध्द मद्यार्क निर्मिती करणारे घटक ( मार्फत : अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क )
६. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
७ या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
८ अभिलेख शाखा ( ५ प्रती )